# University of Mumbai

Academic Planning & Development Section

No. APD/ICC/300/12/2018
27th September, 2018

Circular :-

In continuation of our earlier Circular No. APD/ICD/595/263/2018 dated 8 th August, 2018, it is further informed that, the last date of submitting proposals for "Smt. Savitribai Phule Best Teacher Award" is extended up to 12th October, 2018.

Proposals received after 12th October, 2018 will not be considered by the University.

(Circular No. APD/ICD/595/263/2018 dated 8th August, 2018 is available on the University website www.mu.ac.in)

Mumbai – 400 032
27th September, 2018

(Prof. S.G. Bhirud)
Registrar (I/C)

To,
The Principals of all Affiliated Colleges, Institutions and Heads of the University Departments, for information.

# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग,
APD/ICD/595/263 /2018
८ ऑगस्ट, २०१८

विषय : — विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१८).

परिपत्रकः

विद्यापीठाच्या विविध विभागांचे/संस्थाचे विभागप्रमुख/संचालक, सर्व संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये/संस्थांचे प्राचार्य/संचालक यांच्याकडून "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१८) प्रदान करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, श्रीमती सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या कालखंडात समाजामध्ये स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून केलेल्या संस्मरणीय कार्याबद्दल व त्यांच्या स्मृतीपित्यर्थ मुंबई विद्यापीठातर्फे सन २००३ या सालापासून विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणा-या विद्यापीठ विभागातील/महाविद्यालयांतील शिक्षिका (एक शहरी व एक ग्रामीण) अशा एकूण दोन आदर्श शिक्षिकांना **"श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार"** प्रदान करून गौरव करण्यात येतो. सन २०१८ या सालाकरिता सदर पुरस्कारासाठी पात्र शिक्षिकांची निवड करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती गठीत करण्यात येणार आहे. विद्यापीठातर्फे निवड होणा-या पुरस्कारप्राप्त शिक्षिकांना प्रत्येकी रूपये १०,०००/— रोख व त्यासोबत मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

विद्यापीठाचे विविध विभाग/महाविद्यालयीन स्तरावर किमान **१५ वर्षे** सलग स्थायी सेवा झालेल्या व विशेष गुणवत्ता, अर्हता प्राप्त केलेल्या आणि अनुभव असलेल्या पात्र शिक्षिकांचे आपणांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव विद्यापीठाने गठीत केलेल्या निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थामध्ये क्रियाशिल सहभाग व उल्लेखनीय कामगिरी, व्यक्तिगत स्तरावर केलेल्या कार्याबाबतचे विश्वासार्ह अहवाल, स्त्रियांच्या प्रश्नावर केलेले अभ्यासपूर्ण संशोधन व उल्लेखनीय लेखन, आर्थिक स्तरावर स्त्रियांना सक्षम करण्यासाठी केलेले प्रयत्न, स्वयंरोजगार, प्रशिक्षण, अंगणवाडी, हुंडा निर्मुलन, स्त्री—पुरूष समानता, स्त्री शोषण, जातियता निर्मुलन, सर्वधर्मसमभाव अशा उपक्रमांमध्ये क्रियाशिल सहभाग अशा गोष्टी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

समितीपुढे विचारार्थ ठेवण्यासाठी आपल्या संस्थेतील जास्तीत—जास्त दोन पात्र शिक्षिकांचे स्वंयपुर्ण प्रस्ताव (४ प्रति) त्यांच्या स्वाक्षरीनिशी सोबत जोडलेल्या 'अ', 'ब' आणि 'क' या विवरण पत्रासोबत माहिती भरून आपल्या शिफारशीसह **सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, कक्ष क्र. १३२, पहिला मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.** यांच्याकडे सोमवार, दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ पर्यंत सादर करावेत. त्यानंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तसेच, अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

आपणांस असेही कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराच्या प्रस्तावाबाबत सुचक व अनुमोदक अशा दोन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील स्थायी सेवेत असलेल्या शिक्षक कर्मचा–यांच्या स्वाक्ष–या असणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे अर्जदाराने प्रपत्रातील विहित रकान्यात आपल्या स्वतःच्या प्रस्तावास संमती असल्याचे जाहीर करणे आवश्यक राहील.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व संबधित शिक्षिकांच्या निदर्शनास आणून द्यावे. सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळ www.mu.ac.in या लिंकवर उपलब्ध आहे.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

मुंबई – ४०० ०३२.
८ ऑगस्ट, २०१८

<u>पुरस्काराकरीता प्राथमिक अटी</u> :– खालील अटी पूर्ण करणा–या शिक्षिका "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका" पुरस्काराकरिता अर्ज करण्यास/प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

१. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेल्या शिक्षिका असणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाची मान्यता प्रत जोडणे आवश्यक राहिल.
२. शिक्षिकांनी नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले/प्रतिनियुक्तीवर आहेत अशा शिक्षिका पुरस्कारासाठी <u>अपात्र</u> राहतील.
३. शिक्षिकांनी कमीत–कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य देतील.
४. "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्राप्त शिक्षिका, पुनःश्च अशा पुरस्काराठी पात्र राहणार नाहीत.
५. शिक्षिकाविरूध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबधित शिक्षिका देतील.
६. शिक्षिका खाजगी शिकवणी करीत नसाव्या, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
७. संबधित महाविद्यालयांचे मुल्यांकन (Accreditation) अनिवार्य राहील. सोबत प्रत जोडावी.
८. (i) विद्यापीठातील विभागप्रमुख/संचालिका यांनी त्यांचा प्रस्ताव मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्यामार्फत सादर करावा.
   (ii) शासकिय महाविद्यालयातील संस्थेतील, प्राचार्य/संचालिका यांचा प्रस्ताव मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे मार्फत सादर करावा.
   (iii) महाविद्यालयातील प्राचार्य/संचालिका यांनी त्यांचा प्रस्ताव संस्था चालक यांच्या मार्फत सादर करावा.

---

प्रति,

१) विद्यापीठाच्या विविध विभागाचे/संस्थाचे विभागप्रमुख/संचालक

२) सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व औषधशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्थांचे संचालक.

(अ) प्रत सविनय अग्रेषित :–
१. प्राचार्य, सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालय
२. संचालक, परिक्षा व मूल्यांकन
३. वित्त व लेखा अधिकारी
४. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहिती शास्त्र

(ब) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित :–

१. संचालक, जमनालाल बजाज शिक्षण संस्था,
२. संचालक, विद्यार्थी विकास विभाग,
३. संचालक, शारिरिक शिक्षण आणि क्रिडा,
४. संचालक, पौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभाग,
५. प्राध्यापक नि–संचालक, दूर शिक्षण संस्था,
६. संचालक, हयुमन रीर्सोस डेव्हलपमेंट सेंटर,
७. संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था,
८. संचालक, अल्केश दिनेश मोदी अर्थशास्त्र व व्यवस्थापन अभ्यास संस्था,
९. संचालक, प्रशासकीय प्रगती अकादमी, विद्यानगरी,
१०. संचालक, रंगभूमी कला विभाग, विद्यानगरी,
११. गंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय,
१२. प्राध्यापक, गुरूदेव टागोर तौलानिक साहित्य अध्यासन,
१३. समन्वयक, लोककला अकादमी, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई,
१४. समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी,
१५. समन्वयक, डॉ. आबेडकर सामाजिक न्याय केंद्र,
१६. अध्यक्षा, महिला विकास कक्ष,
१७. प्रभारी संचालक, ठाणे उपकेंद्र, ठाणे
१८. मुंबई विद्यापीठ विधी विद्यानिकेतन फोर्ट परिसर
१८. स्वीय सहायक मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव

(क) प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

१. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ शिक्षक संघ, विद्यानगरी परिसर
२. सचिव, अशासकीय महाविद्यालये संघटना (ANGC), विद्यापीठ विद्यार्थी भवन, 'बी' रोड, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.
३. सरचिटणीस, महारा ट्र अंडर प्रीव्हीलेज्ड टिचर्स असोसिएशन, फ्लॅट क्र. १००१/बी–१, विहंग उदयान, वर्तक नगर, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०६.
४. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ आणि महाविद्यालय शिक्षक संघटना.

प्रपत्र 'अ'

सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१८)

| | | |
|---|---|---|
| १. | शिक्षिकेचे संपूर्ण नांव | |
| २. | पूर्ण पत्ता | <br><br><br>जिल्हा: |
| | भ्रमणध्वनी | |
| | दूरध्वनी क्रमांक (निवास) | |
| ३. | सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे/<br>विद्यापीठ विभागाचे नाव व पत्ता | |
| ४. | धारण केलेले पद (स्थायी) | |
| ५. | अध्यापनाचा अनुभव | |
| ६. | शैक्षणिक अर्हता | |
| ७. | प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकाचे संपूर्ण<br>नांव<br>पत्ता<br>भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ८. | सूचकाचे महाविद्यालय/विद्यापीठ<br>नांव,<br>पत्ता व मोहर<br><br>प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकांची दिनांकित<br>स्वाक्षरी | |
| ९. | प्रस्तावास अनुमोदन देणा—या शिक्षकाचे<br>नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| १०. | अनुमोदकाचे महाविद्यालय/विद्यापीठ<br>विभागाचे नाव, पत्ता व मोहर<br>प्रस्ताव सुचविणा—या शिक्षकांची दिनांकित<br>स्वाक्षरी | |

मी खाली सही करणार श्रीमती/कुमारी .................................................................................. असे जाहीर करते की उपरोक्त माहिती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :

शिक्षिकेची स्वाक्षरी

श्रीमती/कुमारी ............................................................ हया आमच्या विभागात ................................ या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो/करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी

# प्रपत्र – 'ब'

## सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१८)

### गुणतक्ता

| क्र. | पी.एच.डी. किंवा नेट सेट उत्तीर्ण झालेले असल्यास (प्रती सादर कराव्यात) | ग्रंथ/लेखन इत्यादी (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) (प्रति सादर कराव्यात) | सहशैक्षणिक उपक्रमातील सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान इत्यादी बाबत सहभाग (प्रति सादर कराव्यात) | सामाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्रीशोषणाविरूध्द जाणीव आणि जागृती, स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इत्यादी बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/बक्षिसे | थोडक्यात परिचय (स्वतंत्र परिशिष्ट जोडावे– प्राचार्यांनी प्रमाणित केलेले असावे) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

दिनांक :

ठिकाण :

विद्यापीठाच्या विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे
प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहोर/शिक्का

## प्रपत्र 'क'

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती/कुमारी ..........................................................................

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम – प्राध्यापक/ अधिव्याख्याता/प्रपाठक ........................................

यांचा गतोतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही फौजदारी चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरू नाही.

ठिकाण :–

दिनांक :–

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी/शिक्का